# सुहास्य Dental Clinic

**CENTRE FOR ESTHETICS GUM CARE & IMPLANT DENTISTRY**

## दात काढल्यानंतर रुग्णांनी घ्यावयाची काळजी

**सुचना :**

1. दात काढल्यानंतर जास्त रक्तस्त्राव होऊ नये म्हणून डॉक्टरांनी ठेवलेला कापसाचा बोळा १ तास दाबून धरा. तो बदलू नका.
2. दात काढल्यानंतर त्या दिवशी दिवसभर थुंकू नका, तोंडातील थुंकी गिळून घ्या. जास्त बोलू नका. गुळण्या करू नका.
3. दात काढल्यानंतर त्या जागी बोट लावू नये.
4. दात काढलेल्या जागी बाहेरून बर्फाने अथवा थंड पाण्यात भिजवलेल्या कापडाने शेका. थोडी सूज आली तर काळजी करु नका. गरम कापडाने किंवा पाण्याने शेकु नका त्याने सूज जास्त येईल.
5. एका तासानंतर ठेवलेला कापसाचा बोळा काढा व तुम्हाला देण्यात आलेली औषधे वेळेवर घ्या.
6. दात काढल्यानंतर दुसऱ्या बाजूने थंड, नरम पदार्थ जसे की खिचडी, भात, खीर, इ. खावे. गरम, तिखट, कडक पदार्थ खाऊ नये ज्यामुळे जखमेला त्रास होऊ शकतो.
7. जखम भरेपर्यंत, पान, तंबाखु, विडी, सिगारेट, इ. चे सेवन करू नये. त्यामुळे जखम लवकर भरत नाही.
8. दात नेहमीप्रमाणे स्वच्छ घासा व तोंड स्वच्छ ठेवा म्हणजे जखम लवकर बरी होण्यास मदत होईल.
9. दुसऱ्या दिवसापासून २-३ वेळा मीठाच्या कोमट पाण्याने गुळण्या करा. लिहून दिलेली औषधे व गोळ्या योग्य वेळी योग्य प्रमाणात घ्या म्हणजे त्रास होणार नाही.
10. दात काढल्यावर थोडा वेळ रक्त येऊ शकते परंतु जास्त रक्तस्त्राव, खूप सूज अथवा तीव्र वेदना यापैकी कुठलीही तक्रार असल्यास लगेच डॉक्टरांना दाखवा. कृपया घरगुती उपचार करु नका.
11. दात काढल्यानंतर त्याजागी कृत्रिम दात बसवून घेणे आवश्यक आहे. ते न बसविल्यास बाकीचे दात मागेपुढे सरकतात त्यामुळे दातांमध्ये फटी पडतात.


**Dr Tushar S. Shirude** MDS

Periodontist &Implantologist

8600786692